कल्याण वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ७९९ /२०२६ दि. २६/०५/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, **कल्याण** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि.२७/०५/२०२६ रोजी किंवा दि.२८/०५/२०२६ रोजी मुस्लीम बांधवांचा **'बकरी ईद'** (चंद्र दर्शनानुसार एक दिवस मागे किंवा पुढे) सण साजरा करण्यात येणार आहे. सदर सणानिमित्त कल्याण शहरातील दुर्गाडी इदगाह येथे सार्वजनिक नमाज पठणाचा कार्यक्रम होत असतो. तसेच त्याच दिवशी व त्याचवेळी शिवसेना पक्ष तर्फे दुर्गाडी किल्ल्यावर दुर्गामाता मंदिरात घंटानाद कार्यक्रम केला जातो. सदर वेळी हिंदु कार्यकर्त्यांना लाल चौकी – दुर्गामाता चौक दरम्यान रस्त्यावर बॅरीकेटींग करुन अटकाव केला जातो. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून खालीलप्रमाणे वाहतूक नियंत्रण अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद –	**१)** कल्याण शहरातील लालचौकी कडून भिवंडी कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **लालचौकी** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदर वाहने लालचौकी येथून उजवे वळण घेवून आधारवाडी चौक – वाडेघर सर्कल मार्गे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**२)** भिवंडी कडून कल्याण शहरातील आग्रा रोड मार्गे व गोविंदवाडी बायपास मार्गे कल्याण कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **दुर्गामाता चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदर वाहने दुर्गामाता चौक येथून डावे वळण घेवून वाडेघर सर्कल – आधारवाडी चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**३)** कल्याण (पूर्व) कोळसेवाडी बाजू कडून गोविंदवाडी बायपास मार्गे दुर्गामाता चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **पत्रीपूल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदर वाहने पत्रीपूल – गुरुदेव हॉटेल – शिवाजी चौक – सहजानंद चौक मार्गे लाल चौकी येथून उजवे वळण घेवून आधारवाडी चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**४)** कल्याण शहराअंतर्गत दुर्गाडी चौक – गोविंदवाडी बायपास – पत्रीपूल मार्गे व दुर्गाडी चौक – शिवाजी चौक – पत्रीपूल मार्गे जाणाऱ्या कंटेनर, ट्रेलर, इत्यादी मल्टीएक्सेल, जड, अवजड तसेच सरकारी व खाजगी बसेस वाहनांच्या वाहतूकीस **'बकरी ईद'** चे दिवशी दिवसा व रात्रौ सर्व वेळात **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना दि.२७/०५/२०२६ रोजी किंवा दि.२८/०५/२०२६ रोजी रात्रौ ००:०० वा.ते **'बकरी ईद'** (चंद्र दर्शनानुसार एक दिवस मागे किंवा पुढे) नमाज पठणाचा कार्यक्रम संपेपर्यंत अंमलात राहील.

सदर अधिसूचना फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

(**पंकज शिरसाट**)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका
प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर
परिवहन व्यवस्थापक, कल्याण डोंबिवली महानगरपालिका
विभाग नियंत्रण, राज्य परिवहन, कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत :– सपोआ, कल्याण व भिवंडी वाहतूक विभाग, ठाणे शहर
प्रभारी अधिकारी, कल्याण, कोळशेवाडी, डोंबिवली, कोनगाव, भिवंडी वाहतूक उप विभाग, ठाणे शहर.